| MHKO050018092025 | **संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१२२३/२०२५.**<br>**(महाराष्ट्र सरकार वि. सुनिल अनार गागडे)**<br>**न्या य नि र्ण य**<br>(घोषित दि.०२ जुलै, २०२६) |
|---|---|

सदर खटला आरोपी विरुध्द मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) अंतर्भूत वर्णिलेल्या अभिकथीत अपराधासाठी अभियोजीत करण्यात आला आहे.

**अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत येणेप्रमाणेः**

**२.** दि.२२/०२/२०२२ रोजी १९.४० वाजताच्या सुमारास शहापूर गांवातील मलाबादे चौक, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे आरोपीने बेकायदेशीररित्या स्वतःचे फायद्यासाठी चोरटी विक्री व्यवसाय करण्याच्या इराद्याने ३२ लिटर गावठी हातभट्टीची दारु अंदाजे किंमत रक्कम रु.१२८०/- चा गुन्ह्याचा माल स्वतःचे कब्जात बाळगलेला मिळून आला. त्याप्रमाणे फिर्यादीने मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करून त्याचा रितसर जप्ती पंचनामा केला. त्यानंतर जप्त मुद्देमालापैकी एक बाटली रासायनिक विश्लेषणाकरिता राखून ठेवून उर्वरित मुद्देमाल गावठी हातभट्टीची दारु जागीच नाश केली व तसा सविस्तर वेगळा पंचनामा पंचासमक्ष तयार केला. आरोपी विरुध्द पुरावा मिळून आल्याने फिर्यादीने आरोपी विरुध्द फिर्याद दिली.

**३.** सदर फिर्यादीवरुन गु.र.नं.२८/२०२२ मुंबई दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) नुसार आरोपी विरुध्द गुन्हा नोंद होवून पो.ना.श्री.एम.बी.कांबळे यांनी गुन्ह्याचा तपास केला.

**४.** अन्वेषण अधिकारी यांनी अन्वेषणामध्ये साक्षिदारांचे जबाब नोंदविले आणि खटल्यासंदर्भीचे दस्तऐवज हस्तगत केले. अन्वेषण पुर्ण झाल्यानंतर त्यांनी आरोपी विरुध्द दोषारोपत्र अन्वेषणासंदर्भीच्या तत्सम दस्तऐवजांसह न्यायालयात दाखल केले.

**५.** दि.२९/०९/२०२५ रोजी आरोपी विरुध्द मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) अंतर्भूत वर्णिलेल्या अपराधासंदर्भी गुन्ह्याचे विवरण **नि.क्र.७** वर निश्चित केले. त्याअन्वये आरोपीने सदर खटल्या संदर्भीचे सर्व दस्तऐवज प्राप्त झाल्याचे व सदरचा गुन्हा नाकबूल असल्याचे स्वैच्छीक प्रतिपादन करुन संपरिक्षेची तयारी दर्शविली. आरोपी विरुद्ध गुन्हा दर्शक पुरावा न आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब नोंदविण्यात आला नाही.

६. प्रस्तुतच्या प्रकरणातील अभिलेखावरील पुरावा, आरोपीचा बचाव आणि उभयपक्षांचे युक्तिवाद आणि तत्सम दस्तऐवजांचे काळजीपुर्वक अवलोकन करता खालील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. तत्संदर्भीचे निष्कर्ष मी तद्नंतर सकारण लेखीनिर्विष्ट केले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.२२/०२/२०२२ रोजी १९.४० वाजताच्या सुमारास शहापूर गांवातील मलाबादे चौक, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे आरोपीने बेकायदेशीररित्या स्वतःचे फायद्यासाठी चोरटी विक्री व्यवसाय करण्याच्या इराद्याने ३२ लिटर गावठी हातभट्टीची दारु अंदाजे किंमत रक्कम रु.१२८०/- चा गुन्ह्याचा माल स्वतःचे कब्जात बाळगलेला मिळून आला अशा प्रकारे आरोपीने मुंबई दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले काय? | **नकारार्थी.** |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>कारणमिमांसा</u>

७. आरोपीवर मुंबई दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) अंतर्गत तोहमत असलेला अपराध व तत्संदर्भीचा निश्चित केलेला दोषारोप प्रतिष्ठापित करण्याचे प्रयोजनार्थ अभियोगपक्षाने साक्षिदार क्र.१ घटनास्थळ व जप्ती पंच सर्जेराव तुकाराम कळंत्रे यांची साक्ष नोंदविली. अभियोगपक्षास संधी देऊनही अभियोगपक्षाने फिर्यादी व इतर साक्षिदारांची साक्ष नोंदवली नाही.

**<u>मुद्दा क्र.१ करीता</u> :-**

८. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.पी.शेटे आणि आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.व्ही.डी.जाधव यांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणातील अभिलेखावरील पुरावे आणि दस्तऐवजांचे काळजीपुर्वक अवलोकन केले.

९. अभियोगपक्षातर्फे साक्षिदार क्र.१ घटनास्थळ व जप्ती पंच सर्जेराव तुकाराम कळंत्रे यांनी त्यांच्या साक्षीमध्ये असे कथन केले की, दि.२२/०२/२०२२ रोजी शहापूर पोलिसांनी त्यांना शहापूर गांवातील मलाबादे चौक, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याकामी बोलविले नव्हते. पोलिसांनी त्यांच्या समोर कोणताही मुद्देमाल जप्त केला नाही. पंचनाम्यातील मजकूर त्यांना सांगता येणार नाही. पोलिसांनी त्यांची

एका को-या कागदावर सही घेतली. सदर साक्षिदार अभियोगपक्षाच्या कथनाला दुजोरा देत नसल्यामुळे अभियोगपक्षातर्फे त्यांचा उलटतपास घेण्यात आला. परंतु, त्याने त्याच्या उलटतपासात घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याबाबत काही कथन केले नाही.

**१०.** आरोपी विरुध्द ठेवलेला गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षास सर्व शंकेच्या पलीकडे जावून सबळ पुराव्यानिशी गुन्हा सिध्द करणे गरजेचे असते. सदर प्रकरणात अभियोग पक्षातर्फे फिर्यादी व तपासी अंमलदार यांची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. त्यामुळे फिर्याद, घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिद्ध झालेला नसल्यामुळे आरोपीच्या ताब्यातून जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा गावठी हातभट्टीची दारु असल्याचे सिद्ध होत नाही. सदर प्रकरणामध्ये अभियोगपक्षाने रासायनिक पृथक्करण विभागाचा अहवाल केला नसल्यामुळे जप्त मुद्देमाल हा गावठी हातभट्टीची दारु असल्याचे सिध्द होत नाही. तसेच अभियोगपक्षातर्फे फिर्यादी, तपासी अंमलदार व इतर कोणत्याही स्वतंत्र साक्षिदाराची साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळे केवळ घटनास्थळ व जप्ती पंचाच्या साक्षीवरुन आरोपीने गुन्हा केल्याचे संशयापलीकडे जाऊन सिध्द होऊ शकत नाही.

**११.** वरील सर्व बाबींचा विचार करता या न्यायालयाचे असे मत आहे की, अभियोगपक्षाने आरोपी विरुध्द ठेवलेला गुन्हा संशयाच्यापलीकडे जाऊन सबळ व समर्पक पुरावा देऊन सिध्द केलेला नाही. म्हणून मी **मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी** देत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करीता</u> :-**

**१२.** मुद्दा क्र.१ च्या नकारार्थी निष्कर्षावरुन हे स्पष्ट होते की, अभियोगपक्षाने आरोपी विरुध्द ठेवलेला गुन्हा सिध्द केलेला नाही. वरील विवेचनावरुन मी आरोपीला दोषी न ठरविता मुद्दा क्र.२ च्या निष्कर्षासाठी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | **आरोपी सुनिल अनार गागडे** यांची मुंबई दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) खालील आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | जप्त मुद्देमालापैकी सॅम्पल करिता काढलेली जप्त गावठी हातभट्टीची दारु, दारुचा ग्लास व इतर मुल्यहिन वस्तू अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात याव्यात. |

| | |
|---|---|
| | |
| **४.** | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ च्या पुर्ततेकरीता रक्कम रू.१५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र लिहून द्यावे. |

REENA DEEPAK KHARATE
Digitally signed by REENA DEEPAK KHARATE
Date: 2026.07.02 16:01:23 +0530

इचलकरंजी.
दि.०२/०७/२०२६.

(आर.डी. खराटे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, इचलकरंजी.